आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- विकसित भारताची वाटचाल ऑटोमोबाईल क्षेत्रातल्या प्रगतीचीही वाटचाल ठरणार असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर येत्या आर्थिक वर्षात ६ पूर्णांक ७ दशांश टक्के राहील, असा जागतिक बँकेचा अंदाज

- राष्ट्रीय खेल पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान

**आणि**

- इस्रायल आणि हमास दरम्यान युद्धविराम लागू झाल्याची नेतान्याहू यांची घोषणा

**<><><><><>**

विकसित भारताची वाटचाल ऑटोमोबाईल क्षेत्रातल्या प्रगतीचीही वाटचाल ठरणार आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित भारत ग्लोबल मोबिलिटी एक्स्पोच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. आजचा भारत हा भावनांनी, युवा उर्जेनं परिपूर्ण आहे. त्याचे पडसाद भारताच्या ऑटोमोटिव्ह क्षेत्रात पाहायला मिळत आहेत. गेल्या वर्षी भारताचं ऑटो क्षेत्र जवळपास १२ टक्क्यानं वाढलं आहे. मेक इन इंडिया अंतर्गत तयार होणाऱ्या गाड्यांची निर्यातही वाढली आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. या कार्यक्रमानिमित्तानं त्यांनी दिवंगत रतन टाटा आणि ओसामो सुझुकी यांचं स्मरण केलं. वाहन क्षेत्रातल्या प्रगतीच्या वाटेवर

मध्यमवर्गीय माणसांची स्वप्नं पूर्ण करण्यात या दोघांचं मोठं योगदान आहे. असं ते म्हणाले. वाहतुकीसाठी विशेष योजना आणल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिली.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

गुंतवणूक आणि निर्यात या दोन्हींमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केला. प्रधानमंत्र्यांच्या विकसित भारत २०४७ च्या स्वप्नाला साकार देण्यासाठी या एक्स्पोचं मोठं योगदान असेल, असंही गोयल यावेळी म्हणाले.

आज आपण प्रदूषण विरहित वाहतूक विषयावर चर्चा करत आहोत, जो फक्त पर्यावरणासाठीच नव्हे तर आरोग्य आणि समृद्धीसाठी महत्त्वाचा आहे. त्या दृष्टीने सरकारने ऑटोमोबाईल क्षेत्रात सरकारने नव्या धोरणांचा स्वीकार केला आहे. उद्योगांना प्रोत्साहन देताना सरकारने पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही, याचीही काळजी घेतल्याचं एच.डी. कुमारस्वामी म्हणाले.

हा एक्स्पो सहा दिवस चालणार असून येत्या २२ तारखेला त्याचा समारोप होईल. या दरम्यान, विविध कार्यक्रमांचं तसंच संमेलनांचं आयोजन केलं जाणार आहे. यात मोबिलिटी क्षेत्रातल्या धोरणांवरच्या विविध चर्चासत्रांचा समावेश असेल. यंदा भारत मंडपमसह, यशोभूमी आणि ग्रेटर नोएडा इथेही या एक्स्पोचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर येत्या आर्थिक वर्षात ६ पूर्णांक ७ दशांश टक्के राहील, असा अंदाज जागतिक बँकेनं व्यक्त केला आहे. जागतिक अर्थव्यवस्थांबद्दलचा जागतिक बँकेचा अहवाल काल प्रसिद्ध झाला, त्यात म्हटलंय की चालू आर्थिक वर्षातला वाढीचा दर साडेसहा टक्के राहण्याची शक्यता आहे. गेल्या आर्थिक वर्षात हा दर ८ पूर्णाक २ दशांश टक्के होता. आगामी वर्षात सेवा क्षेत्रात सातत्यपूर्ण वाढ दिसेल, तर सरकारी पाठबळाच्या आधारावर उद्योगक्षेत्र ६ पूर्णांक ७ दशांश टक्के दराने वाढेल, असं या अहवालात नमूद केलं आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा जीडीपी वाढीचा दर २ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांवर राहील, असा अंदाज आहे. २०२६मधे भारत जगातली सर्वात जास्त वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असेल, त्याखालोखाल चीन आणि अमेरिकेचा क्रमांक असेल, असा अंदाज जागतिक बँकेनं व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेसोबतचे संबंध दृढ करण्यासाठी बंगळुरूमधल्या नवीन अमेरिकी वाणिज्य दूतावासामुळे चालना मिळेल, असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी व्यक्त केलं आहे. ते आज बेंगळुरूमध्ये अमेरिकेच्या नवीन वाणिज्य दूतावासाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. जयशंकर म्हणाले की दोन्ही देशांमध्ये कृत्रिम बुद्धीमत्ता, अंतराळ क्षेत्र, संरक्षण, ड्रोन, जैव तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रात सहकार्य होऊ शकतं. तंत्रज्ञान, संरक्षण सारख्या क्षेत्रात बेंगळुरू अग्रणी असल्यानं, तसंच हिंदुस्तान एअरोनॉटीक्स लिमिटेड सारख्या संस्था इथं आसपास असल्यामुळे, भारत

आणि अमेरिका दोघांनाही बेंगळुरूमधील वाणिज्य दूतावासाचा फायदा होईल, असंही ते म्हणाले. बेंगळुरू इथला वाणिज्य दूतावास व्यवसाय, शैक्षणिक संस्था, तंत्रज्ञान कंपन्या आणि सर्वसामान्य लोकांना मदत करेल आणि नवीन वाणिज्य दूतावास लवकरच इथं व्हिसा सेवा सुरू करेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. जगाशी संबंध वाढवल्यामुळे भारत देशभरात त्यांचे वाणिज्य दूतावास उघडण्यासाठी प्रयत्न करत आहे. भारत लवकरच लॉस एंजेलिसमध्ये आपले वाणिज्य दूतावास उघडणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. अमेरिकेचे भारतातील राजदूत एरिक गार्सेटी आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय खेल पुरस्कारांचं वितरण आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झालं. नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात देशातला सर्वोच्च क्रीडा सन्मान बुद्धिबळाचा जगज्जेता डी गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग, पॅरा ॲथलीट प्रवीण कुमार, आणि नेमबाज मनु भाकर या चौघांना प्रदान करण्यात आला. ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कारानं गौरवण्यात आलं .
क्रीडाप्रशिक्षकांना देण्यात येणारा द्रोणाचार्य पुरस्कार नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांच्यासह ५ जणांना प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रातला नेमबाज स्वप्नील कुसाळे आणि पॅरा अथलीट सचिन खिलारी यांच्यासह ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आलं.

ज्येष्ठ खेळाडू सुचा सिंग आणि दिव्यांग जलतरणपटू मुरलीकांत पेटकर यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार देण्यात आला. विद्यापीठ खेलो इंडीया क्रीडास्पर्धांमधे सर्वाधिक पदकं मिळवणाऱ्या चंडीगढ विद्यापीठाला मौलाना अबुल कलाम आझाद करंडक राष्ट्रपतींनी प्रदान केला.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये काल माओवाद्यांबरोबर झालेल्या चकमकीच्या ठिकाणावरून सुरक्षादलानं १२ माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. छत्तीसगडमधल्या बीजापूर जिल्ह्यातल्या पामेड आणि बासागुडा विभागात काल ही चकमक झाली होती. हे नक्षलवादी पीएलजी बटालियन नंबर वन आणि सेंट्रल रिजनल कमीटीचे सदस्य असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

कतारमध्ये इस्त्रायल आणि हमास यांच्यातल्या वाटाघाटीनंतर गाझामध्ये ओलिस ठेवलेल्यांना सोडवण्यासाठी आणि युद्धविराम लागू करण्यासाठी करार झाला असल्याचं इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी आज जाहीर केलं. नेतन्याहू यांनी करारावर मतदान घेण्यासाठी आज सुरक्षा मंत्रिमंडळाची बैठक बोलावली होती, त्यात या कराराला मान्यता देण्यात आली. हा करार यशस्वीरित्या पार पडल्या बद्दल नेतान्याहू यांनी सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानले. इस्त्रायल आणि हमासमध्ये गेली 15 महिने संघर्ष सुरू होता त्यामुळे या करारानंतर ओलीसांची सुटका होणार आहे. म्हणून या कराराला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे.

**<><><><><>**

दक्षिण कोरियाचे राष्ट्रपती यून सुक येओल यांच्या अटकेला आव्हान देणारी याचिका सेऊल इथल्या न्यायालयाने फेटाळली आहे. येओल यांच्यावर नॅशनल असेंब्लीमध्ये महाभियोग प्रस्ताव मंजूर झाला आहे. दोन दिवसांपूर्वी त्यांना ताब्यात घेण्यात आलं होतं. येओल यांना झालेली अटक अवैध असल्याचा तसंच या प्रकरणाचा तपास वेगळ्या संस्थांकडे सोपवला जावा असा दावा आज झालेल्या सुनावणीत करण्यात आला. मात्र, न्यायालयानं हा दावा फेटाळून लावला आहे.

**<><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या मिश्र दुहेरीच्या मेलबर्न इथं आज झालेल्या सामन्यात भारताचा रोहन बोपण्णा आणि चीनची शुआई झांग जोडी विजयी ठरली.  पहिल्या फेरीत या जोडीनं क्रोएशियाचा इवाना डोडिग आणि फ्रान्सची क्रिस्टीना म्लादेनोविक या जोडीचा ६-४,६-४असा पराभव करत पुढची फेरी गाठली.

ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेच्या दुहेरी प्रकारात रोहन पराभूत झाला होता. परंतु मिश्र दुहेरी स्पर्धेत झांगबरोबर रोहननं चांगली कामगिरी बजावली. मिश्र दुहेरीत या दोघांनी एक तास १२ मिनिटांचा खेळ करत प्रतिस्पर्धी जोडीला पराभूत केलं.

**<><><><>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने महिलांच्या प्रीमियर लीगचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. वुमन्स प्रीमियर लीगच्या तिसऱ्या सत्राची सुरुवात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि गुजरात जायंट्स

यांच्यातल्या सामन्याने होईल. हा सामना १४ फेब्रुवारी रोजी वडोदऱ्यातल्या बीसीए मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल. यंदा वडोदरा, बेंगळुरू, लखनौ आणि मुंबईत सामने होणार आहेत. या स्पर्धेचा अंतिम सामना १५ मार्च रोजी मुंबईत होईल.

**<><><><><>**

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताची महिला खेळाडू अग्रमानांकीत पी. व्ही. सिंधुने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर मैदानात काल झालेल्या सामन्यात तिने जपानच्या मनामी सुईझू हिचा २१-१५, २१-१३, असा पराभव केला.

**<><><><><>**

विश्वचषक खोखो स्पर्धेत भारताच्या पुरुषांच्या आणि महिलांच्या संघांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला असून आपापल्या गटात दोन्ही संघ अव्वल स्थानावर आहेत.

**<><><><><>**

उत्तर भारतातील बहुतांश भागात धुक्याची चादर पसरली आहे. दिल्ली एनसीआर भागात आज सकाळी दाट धुकं आहे. पंजाब, हरियाणा, चंदिगड, उत्तर प्रदेश, दिल्ली एनसीआर आणि राजस्थान भागात रात्रीच्या वेळी तसंच उद्या सकाळी दाट धुकं राहील.

**//<><><><><>//**